**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १००/२०१९ मधील निशाणी क्र. ३० वरील आदेश</u>**

( कमळाबाई पथवे व इतर वि. ठकुबाई लोते व इतर)

वादी यांनी सदरचा अर्ज वादी क्रमांक २ यांचे कायदेशिर प्रतिनिधी अभिलेखावर सामील करणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** वादी क्रमांक २ यांचा मुत्यु दिनांक २०.०९.२०२३ रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर वादी क्र. २ चे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक १९.१२.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे वादी क्र. २ करीताचा दावा अवसायन पावला आहे. नि. २८ व ३६ वरील आदेशाप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात आलेला आहे व दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द करण्यात आला आहे. प्रस्तुत दावा वादीने वाटपाकरीता दाखल केलेला आहे. वादी क्र. २ चे पश्चात त्याचे कायदेशिर प्रतिनिधींना प्रस्तुत दावा चालविण्याचे अधिकार प्राप्त होतो. अर्जामधील नमूद इसम वादी क्र. २ चे कायदेशिर प्रतिनिधी नाही अशी कोणतीही हरकत प्रतिवादींनी नोंदविलेली नाही. त्यामूळे अर्जात नमूद कायदेशिर प्रतिनिधींना वादी क्र. २ चे कायदेशिर प्रतिनिधी म्हणुन दाव्यात सामील करणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टिने आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्रमांक २ यांचे कायदेशिर प्रतिनिधींना अभिलेखावर सामील करण्यात यावे. वादींनी तशी दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत दाखल करावी.

सही/—

( मो. द. ननवरे )

स्थळः— इगतपुरी

दिनांकः— २०/०१/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इगतपुरी.